# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.26/02/2018

प्रकरण क्र. ८५ :- **जाहिरात विभागाच्या उत्पन्नाबाबत धोरण ठरवि[illegible]त निर्णय घेणे तसेच मुख्य रस्त्यावरील कमानींवर दिशादर्शक फलक व जाहिरात फलक प्रदर्शित करण्याबाबत दर व धोरण ठरविणे.**

**ठराव क्र.84 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत विविध व्यक्ती/संस्था/कंपनी यांना महापालिकेच्या जागेत ठेक्याद्वारे होर्डींग्जवर जाहिरात उभारण्याची परवानगी देण्यात येते व खाजगी जागेत ही होर्डींग्ज उभारण्याची परवानगी महानगरपालिका देते. मा. महासभेने सन 2008 साली निश्चित केलेल्या दरानुसार जाहिरात फी आकारली जाते.

दिवसें दिवस मार्केट दर वाढले त्याप्रमाणे महापालिकेच्या जागेत उभारलेल्या होर्डींग्जचे दर वाढत गेले पण प्रशासनाने खाजगी जागेत उभारलेल्या होर्डींग्जचे दर न वाढल्याने महापालिकेचे उत्पन्न बुडाले व खुप मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

शहराची लोकसंख्या वाढल्याने व अनेक उद्योगधंदे शहरात आल्याने जाहिरातीचे दर वाढले त्यामुळे दि.19/07/2014 रोजीच्या मा. महासभेत मार्केट दराप्रमाणे नविन दर मंजुर केला.

ठेकेदारांनी प्रशासनाशी हात मिळवणी करुन सदर दरवाढीची अंमलबजावणी करु नये म्हणून कार्यवाही सुरु केली व प्रशासनाने ठरावाची अंमलबजावणी न करता मार्केट दराचा अभ्यास न करता महापालिकेचे आर्थिक नुकसान करुन ऑगस्ट 2016 रोजी प्रशासनाने कमी दराचा प्रस्ताव तयार करुन मा. महासभेपुढे सादर केला. प्रस्तावात दर कमी असल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होईल म्हणून मा. महासभेत प्रस्ताव घेतला नाही व प्रशासनाने नंतर प्रस्ताव 90 दिवसात मा. महासभेपूढे न आल्याने मंजुर समजुन कार्यवाही सुरु केली. मार्च 2017 मध्ये मा. आयुक्त यांनी आपल्या मनाप्रमाणे मान्यता देवून शासनाची परवानगी न घेता स्वतःचे दर ठरवून कारवाई केली.

चेकनाका ते फाऊंटन हॉटेल हे प्राईम लोकेशन मधील खाजगी जागेतील होर्डींग्ज चे दर मार्केट मध्ये सर्वात महाग असून महापालिकेतर्फे सर्वात कमी दरात म्हणजे रु.16 प्रती चौ.फुट आकारण्यात येत आहे वास्तविक हे दर वाढणे गरजेचे आहे, पण हे दर वाढवले नाही, नुकतेच जाहिरातीची निविदा प्रशासनाने काढली असता महापालिकेने ठरविलेल्या रक्कमेपेक्षा दुपटीने व त्याहून अधिक वाढीव रक्मेची निविदा प्राप्त झाली आहे यावरुन दिसून येते की, प्रशासनाने ठेकेदारांच्या जास्तीत जास्त फायदा व्हावा व महापालिकेचे नुकसान व्हावे. यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असून महापालिकेचे करोडो रुपयांचे नुकसान झाल्यामुळे मा. महापौरांनी संबंधीत सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करण्यासंबंधी मा. मुख्यमंत्री, लाचलुचपत विभाग तसेच आर्थिक गुन्हे शाखा यांना पत्र द्यावे. मा. आयुक्त यांनी संपूर्ण शहरातील होर्डींग्ज (खाजगी/महापालिकेच्या जागेवरील) चा अभ्यास करुन सुधारीत ठराव मजुर होईपर्यंत आयुक्त यांनी मागील 2014 च्या ठरावाप्रमाणे कारवाई करावी ज्या लोकांनी कमी जुन्या दराने पैसे भरलेले आहे त्यांचेकडून जुन्या 2014 च्या ठरावातील दराने रक्कम वसुल करावी तसेच मार्केट दराप्रमाणे दर ठरवून प्रस्ताव मा. महासभेसमोर ठेवून नविन निविदा काढावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदक :- श्री. श्रीप्रकाश सिंह**

(Rakesh Shah)

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचुन कायम करण्यात आला**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगर सचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका